# सभेचा कार्यवृत्तांत

सोलापूर विद्यापीठाच्या **व्यवस्थापन परिषदेची सभा मंगळवार दि.२९/८/०६ रोजी दुपारी ३-०० वा.** विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागाच्या दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात झाली. या सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. डॉ. इरेश स्वामी - कुलगुरु. | अध्यक्ष |
| २) | श्रीमती डॉ. व्ही. जे. नाईकनवरे. | सदस्य |
| ३) | डॉ. एल. पी. देशमुख. | सदस्य |
| ४) | संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ - पदसिध्द. | सदस्य |
| ५) | प्राचार्य जे. के. बिले. | सदस्य |
| ६) | प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर. | सदस्य |
| ७) | डॉ. पी. जी. मोरे | सदस्य |
| ८) | श्री. एन. बी. पवार. | सदस्य |
| ९) | श्रीमती एन. व्ही. साठे. | सदस्य |
| १०) | श्री. पी. एम. हिरेमठ. | सदस्य |
| ११) | श्री. व्ही. तिरुपती. | सदस्य |
| १२) | डॉ. डी. डी. रणनवरे. | सदस्य |
| १३) | श्रीमती मिनाक्षी सुभाष कदम. | सदस्य |
| १४) | वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १५) | परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १६) | डॉ. पी. बी. कुंभार - कुलसचिव | सचिव |

*मा. जयसिंह मोहिते-पाटील सदस्य व्यवस्थापन परिषद यांनी दि.२८/०८/०६ रोजीच्या पत्रानुसार व्यवस्थापन परिषदेच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याबाबत कळविले होते. त्यानुसार त्यांची विनंती मान्य करण्यात आली.

मा.कुलगुरु यांनी सर्वप्रथम कला व भाषा इमारतीच्या कोनशिला अनावरण कार्यक्रमाची सर्व सदस्यांना माहिती दिली. या कार्यक्रमासाठी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिष्ठाता, विद्यापीठाचे अधिकारी व कर्मचारी जे कार्यक्रमास येणार आहेत त्यांच्याकडून २ फोटो घेऊन त्यांना कार्यक्रमाचे पासेस देण्यात येतील असे सुचविले.

सदरचा कार्यक्रम अत्यंत गडबडीमध्ये ठरलेला असून याबद्दलची माहिती व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना देणे आवश्यक होते परंतु, कार्यक्रम ठरवित असताना सदस्यांच्या भावनेचा विचार केला जाईल व यापुढे कार्यक्रम ठरवित असताना व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना पूर्वकल्पना देण्यात येईल असे मा.कुलगुरु यांनी स्पष्ट केले.

[कृ.मा.प.]

सभेतील विषयांवर खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

**विषय क्र. [ १ ] कला व भाषा इमारतीच्या बांधकामाच्या कोनशिला अनावरण कार्यक्रमाबाबत..**

कला व भाषा इमारतीचा कोनशिला अनावरण कार्यक्रम दि. १ सप्टेंबर, २००६ रोजी सकाळी ११-२० वा. मौजे लिंबीचिंचोळी, ता. दक्षिण सोलापूर, जि- सोलापूर येथे मा. डॉ. मनमोहन सिंग, पंतप्रधान भारत सरकार यांच्या शुभहस्ते, मा. श्री. एस. एम. कृष्णा, कुलपती सोलापूर विद्यापीठ तथा राज्यपाल महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली आणि मा.श्री. सुशिलकुमार शिंदे, केंद्रीय ऊर्जा मंत्री, भारत सरकार, मा. ना. विलासराव देशमुख, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. ना. आर. आर. पाटील, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा.ना. दिलीप वळसे-पाटील, उच्च व तंत्र शिक्षण आणि ऊर्जामंत्री महाराष्ट्र राज्य, मा.ना. विजयसिंह मोहिते-पाटील, ग्रामविकास व पर्यटन मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री सोलापूर जिल्हा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

सबब, व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.

**ठराव क्र. [ १ ] या विषयाची व्यवस्थापन परिषदेने नोंद घेतली.**

विद्यापीठामध्ये कोणत्याही प्रकारचे महत्वाचे कार्यक्रम ठरविणे व त्याचे प्रत्यक्षात आयोजन करणे विषयी प्राचार्य जे. के. बिले यांनी यापूर्वी व्यवस्थापन परिषदेत झालेल्या निर्णयासंदर्भात मा. कुलगुरु व मा. कुलसचिव यांना कोणताही धोरणात्मक निर्णय हा व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनुसार आखावा व त्याची त्यानंतर कार्यवाही करावी असे ठरलेले असताना मा. पंतप्रधानांचा कार्यक्रमा संदर्भात विचारणा केली.

अशा महत्वाच्या कार्यक्रमाची माहिती व रुपरेषा अगोदर ठरवून फक्त व्यवस्थापन परिषदेस माहिती देणे हे योग्य वाटत नाही.

यापुढे अशा प्रकारचे कार्यक्रम व्यवस्थापन परिषदेच्या संमतीने आयोजित करावेत अशी सूचना मांडली.

या संदर्भात कार्यक्रमाची निश्चिती, पाहुणे, व कार्यक्रमाचे व्यवस्थापन इ. बाबत व्यवस्थापन परिषदेमधून एक समिती गठीत करावी अशी सूचना डॉ. एल. पी. देशमुख, व्यवस्थापन परिषद सदस्य, व डॉ. सी. बी. कोळेकर, व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी केली.

त्यानुसार खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात यावी असे ठरले.

१) प्राचार्य जे. के. बिले
२) प्रा. एन. बी. पवार
३) प्रा. सौ. एन. व्ही. साठे

मा.कुलसचिव यांनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु यांच्यावतीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
**डॉ. आय. एस. स्वामी**
**अध्यक्ष.**